बीड ●मंगळवार, दिनांक १० फेब्रुवारी २०२६ ● वर्ष २१ वे ● अंक : ४० ● पाने : ४ http://epaper.beedvastav.com Email : beedvatsav@gmail.com ●किंमत ३ रुपये

स्क्रीन रिडरचा बादशहा

सांज दैनिक बीड RNI : Regd.No.MAH/MAR/2010/43846

# वास्तव

भारतरत्न रतनजी टाटा यांच्या महान देशभक्तीला समर्पित

२१ वर्ष

एडिटर इन चिफ- जितेंद्र सिरसाट

ई पेपर वाचा http://epaper.beedvastav.com

# 1 टक्काही विकलांग नसलेल्या व्यक्तींना सरकारी नोकऱ्या ! उघडे पडणाऱ्यांना आत्महत्येशिवाय पर्यायच उरणार नाही !!

बीड जिल्ह्यातील अनेक व्यक्तींनी बनावट विकलांग प्रमाणपत्रावर मिळवली नोकरी पण उघडे पडण्याच्या भितीने बीपी हाय झाले!!

आपापल्या विभागातील विकलांग व्यक्तींचे यूडीआयडी प्रमाणपत्र तपासण्याचे दिव्यांग कल्याण विभागाने दिले आदेश

बनावट विकलांग प्रमाणपत्राचा घोटाळा नेमका कसा झाला, याबद्दल सदर विभागाने दिलेल्या माहितीत धक्कादायक तपशील समोर

## नोकरी जाणार, संपत्ती जाणार आणि जेलची हवाही खावी लागणार!!

### ➤ बनावट प्रमाणपत्राचा घोटाळा नेमका काय?

● राज्यात विकलांगतेचे प्रमाणपत्र देऊन सरकारी नोकरी मिळवल्याचा मुद्दा विधानसभेत गाजला. अशा लोकांवर कारवाई सुरू असल्याची माहिती 'दिव्यांग कल्याण विभागा'चे मंत्री अतुल सावे यांनी विधानसभेत दिली. आपापल्या विभागातील विकलांग व्यक्तींचे यूडीआयडी प्रमाणपत्र तपासण्याचे आदेश 'दिव्यांग कल्याण विभागा'ने दिले आहेत. त्यानुसार जानेवारीपर्यंत चौकशी पूर्ण होऊन कारवाई पूर्ण होईल अशीही माहिती सावे यांनी दिली.

### ➤ अनेक धक्कादायक तपशील आले समोर

● यूडीआयडी प्रमाणपत्र ही राष्ट्रीय पातळीवरुन जारी होणारी अधिकृत ओळख असून, ती नसल्यास विकलांगत्वाचा दावा ग्राह्य धरला जात नाही. या बनावट विकलांग प्रमाणपत्राचा घोटाळा नेमका कसा झाला, याबद्दल बीबीसी मराठीने या विभागाकडून अधिक माहिती घेतली. त्यातून अनेक धक्कादायक तपशील समोर आले.

●विकलांग कोट्यातून नोकरी मिळवण्यासाठी 40 टक्के विकलांगत्वाची अट आहे.

●अशा लोकांनी प्रमाणपत्र काढल्यानंतर त्यांना यूडीआयडी क्रमांक मिळतो तो संपूर्ण देशात लागू होतो.

●पण असे प्रमाणपत्र एकही टक्का विकलांग नसणाऱ्या लोकांनी मिळवून सरकारी नोकऱ्या लाटल्याचे 'दिव्यांग कल्याण विभागा'च्या चौकशीत पुढे आले आहे.



**एकही टक्का विकलांग नसलेल्या लोकांना सरकारी नोकरी**

**बीड : प्रतिनिधी**

**एकट्या बीड जिल्ह्यातच नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्रामध्ये बनावट विकलांग प्रमाणपत्राचा घोटाळा नेमका कसा झाला, याबद्दल दिव्यांग कल्याण विभागा'चे मंत्री अतुल सावे यांनी विधानसभेत दिली. विशेष म्हणजे संबंधित विभागाने दिलेल्या माहितीत अनेक आणि अत्यंत धक्कादायक तपशील समोर आले आहेत. हे धक्कादायक तपशील समोर आल्यामुळे आपापल्या विभागातील विकलांग व्यक्तींचे यूडीआयडी प्रमाणपत्र तपासण्याचे दिव्यांग कल्याण विभागाने आदेश दिले आहेत. दुर्दैबाचे बाप म्हणजे हे आदेश देऊन आता महिना लोटला आहे. परंतु, ही कारवाई संत गतीने सुरू असल्यामुळे अद्यापही अशी कोणतीही ठोस कारवाई झाल्याचे दिसून येत नाही. दरम्यान दिव्यांग कल्याण विभागाने कारवाईचे आदेश दिल्यामुळे बीड जिल्ह्यातील अनेक व्यक्तींनी बनावट विकलांग प्रमाणपत्रावर नोकरी मिळविल्याचे उघड झाले असून बनावट विकलांग प्रमाणपत्र मिळविणाऱ्यांचे भितीपोटी बीपी हाय झाल्याचे सांगितले जात आहे. कारण एकतर नोकरी जाणार, संपत्ती जाणार आणि जेलची हवाही खावी लागणार आहे. एकूणच 1 टक्काही विकलांग नसलेल्या व्यक्ती सरकारी नोकरी करीत असल्याचे उघड झाल्याने आता त्यांच्याकडे आत्महत्य केल्याशिवाय पर्याय नाही, असेही या प्रकाराच्या निमित्ताने बोलले जात आहे.**

### ➤ आमदारांनी विधानसभेत केली मागणी

● काँग्रेसचे विधानमंडळ गटनेते विजय वडेट्टीवार यांनी सिरोंचा पंचायत समितीच्या कर्मचाऱ्याबद्दल बोगस दिव्यांग प्रमाणपत्रावर नोकरी मिळविल्याचा गंभीर आरोप सभागृहात मांडला. या प्रकरणात आधीच तक्रार दिली असून संबंधित विभागाला पत्र पाठविण्यात आले आहे. पण आतापर्यंत कुठलीही कारवाई झाली नाही, असं ते म्हणाले. त्यावर सावे यांनी उत्तर दिले की, जानेवारीपर्यंत UDID प्रमाणपत्र सादर करणार नाहीत अशा लोकांवर कारवाई केली जाणार आहे. यासोबतच सुनील प्रभू आणि बबनराव लोणीकर यांनी सुद्धा कठोर कारवाई करण्याची मागणी केली.

### ➤ चौकशीतून हेही आले समोर



●चौकशीतून हेही समोर आलं, "यामध्ये दृष्टी, कर्णबधिर, मानसिकदृष्ट्या विकलांग आणि एकाधिक विकलांग अशा 4 प्रवर्गातील जास्त बनावट प्रमाणपत्रं आहेत. म्हणजे जे विकलांगत्व सिद्ध करण्यासाठी वैद्यकीय चाचणीची गरज असते, अशा प्रकारातील जास्त बनावट सर्टिफिकेट आहेत. जे विकलांगत्व डोळ्यांनी दिसतं त्या प्रकारात प्रमाणपत्र मिळवणे कठीण असते.

### उद्याच्या अंकात

**कमी टक्के अपंगत्व असताना टक्केवारी वाढवून घेऊन मोठ्या पदावर अनेक अधिकारी बसले!!**

**टक्केवारी वाढवून अपंगत्व प्रमाणपत्र देणारे बीडचे तेअधिकारी अगोदर जेलमध्ये टाका!!**

**1996 पासून 3 टक्के दिव्यांग व्यक्तींना 3 टक्के आरक्षण मिळाले तेव्हापासून बनावट प्रमाणपत्र मिळवणे सुरू!!**

: साभार बीबीसी मराठी

## विद्यार्थ्यांनी चांगला माणूस व्हावे-डॉ.हनुमंत सौदागर

### ➤ रामराव पाटील माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात दहावीच्या विद्यार्थ्यांना निरोप

➤ केज/प्रतिनिधी

जिद्द चिकाटी मेहनत घेऊन यश संपादन करता येते .विद्यार्थ्यांनी चांगला माणूस व्हावे असे मत डॉ हनुमंत सौदागर यांनी व्यक्त केले ते शहरातील रामराव पाटील माध्यमिक विद्यालयातील इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांच्या निरोप समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष शाळेचे मुख्याध्यापक श्री खोसे, प्रमुख पाहुणे डॉ. हनुमंत सौदागर आदी उपस्थित होते. दहावीचा स्वयंशासन दिन व निरोप समारंभ शनिवार रोजी उत्साहात साजरा



करण्यात आला .इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट पद्धतीने नियोजन करून स्वयंशासन दिन साजरा केला वर्गशिक्षक श्रीमती गिरी मॅडम यांनी मार्गदर्शन केले. निरोप समारंभाच्या कार्यक्रमात श्री देशमुख , श्रीमती डॉ गिरी, श्री गोरे,● पान ३ वर...

## शेतकऱ्यांसाठी हा सुवर्णकाळ नाही तर विषकाळ : खा. रजनीताई पाटील

➤ केज/प्रतिनिधी

अन्नदाता शेतकरी कायम उपेक्षित राहिला आहे. सरकारने शेतकऱ्यांना तात्काळ मदत करावी देशात शेतकऱ्यांसाठी सुवर्णकाळ नाही तर विष काळ आहे. मराठवाड्यातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या हा चिंतनाचा विषय आहे. कृषीप्रधान देशात शेतकऱ्यांच्या आत्महत्या हा चिंतनाचा विषय आहे. ओला दुष्काळ, अतिवृष्टी नापिकी या दुष्टचक्रात शेतकरी अडकला आहे. यामुळे मुलांचे शिक्षण, मुलींचे लग्न यामुळे शेतकरी कर्जबाजारी झाला आहे.




बँकांचे कर्ज फेडणे यामुळे तो हातबल होत आहे. या संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना आत्महत्येला कवटाळावे लागत आहे. ही चिंताजनक बाब आहे. कोट्यवधी रुपयांचे कर्ज बुडून उद्योजक देश सोडून पळून जातात पण शेतकऱ्यांचा मात्र बँका छळ करताहेत शेतकऱ्यांना तात्काळ भरीव मदत करावी अशा शब्दात खा .रजनीताई पाटील यांनी राज्यसभेत सरकारवर निशाणा साधला.

## बीड जि प साठी भाजपची रणनीती ठरली; पंकजाताईंची बदामराव पंडितांनी घेतली भेट

➤ गेवराई : प्रतिनिधी

बीड जिल्हा परिषदेसह गेवराई पंचायत समितीची लवकरच निवडणूक जाहीर होणार असल्याच्या पार्श्वभूमीवर भाजपा नेते माजी राज्यमंत्री बदामराव पंडित आणि भाजपा युवानेते युधाजित पंडित यांनी मुंबई येथे राज्याच्या ग्रामविकास व महिला बालकल्याण मंत्री पंकजाताई मुंडे यांची रामटेक येथे जाऊन भेट घेतली. यावेळी गेवराई तालुक्यातील जि प आणि पं स च्या निवडणुकी संदर्भात सविस्तर चर्चा झाल्याचे समजते.



गेवराई तालुक्यात माजी राज्यमंत्री बदामराव पंडित आणि युवा नेते बाळराजे पवार यांनी भाजपा मध्ये एकत्रितपणे काम करण्याचा निर्णय घेतल्यानंतर, पहिल्याच झालेल्या गेवराई नगर परिषदच्या निवडणुकीत घवघवीत यश मिळवत भाजपने एक हाती झेंडा फडकवला आहे. आता होऊ घातलेल्या जिल्हा परिषद आणि पंचायत समितीची निवडणूक माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांच्या नेतृत्वाखाली होणार आहे. त्याबाबत रणनीती ठरवण्यासाठी आणि गेवराई मतदार संघातील विविध विकास कामांच्या नियोजनासाठी माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांनी दिनांक 9 फेब्रुवारी 2026 रोजी मुंबई येथे जाऊन राज्याच्या ग्रामविकास व महिला बालकल्याण मंत्री पंकजाताई मुंडे यांची त्यांच्या रामटेक या● पान ३ वर...

## वरपगावाचे शिवराम पुरी मठसंस्थान भाविकांचे प्रेरणास्थान - आ. नमिता मुंदडा

### ●जंरागे पाटील यांनी दिल्या शुभेच्छा तर सुषमा अंधारे यांची उपस्थिती
### ● हजारो गर्दीने पार पडला रामकृष्ण महाराज सप्ताह सोहळा

➤ केज/प्रतिनिधी

तालुक्यातील भाविकांचे श्रद्धास्थान असलेले वरपगावाचे शिवरामपुरी मठसंस्थान या भागातील लोकांचे प्रेरणास्थान असून या मठसंस्थांनाने गेली साडेतीनसे वर्षे केलेली समाजाची अद्यात्मिक सेवा भूषनीय असून गेली सहा-सात दशकात मठाधीपती वै नागेश पुरी महाराज व त्यानंतर वै रामकृष्ण पुरी महाराज यांनी अध्यात्मिक प्रबोधनद्वारे मोठे कार्य करून संस्थांनाचे नांव महाराष्ट्राच्या कानकोपऱ्यात पोहोंचवले आहे असे गौरौदगार केज विधानसभेच्या आमदार नमिताताई मुंदडा यांनी येथील सप्ताह समारोपाच्या वेळी बोलताना व्यक्त केले.



केज तालुक्यातील वरपगांव येथे शिवराम पुरी मठसंस्थानातं प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी रामकृष्ण महाराज स्मृती साप्ताहचे आयोजन करण्यात आले होते. याही वर्षी एकतीस जानेवारी ते 7 फेब्रुवारी दरम्यान साप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते.● पान ३ वर...

# आजचे राशि भविष्य

## मेष रास

➤ या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस गोंधळात टाकणारा असेल. तुम्हाला विनाकारण खूप धावपळ करावी लागेल, ज्यामुळे तुमचे मन अस्वस्थ होईल. काही काम पूर्ण न झाल्यामुळे तुम्ही निराश व्हाल, परंतु तुम्हाला तुमच्या बोलण्यात आणि वागण्यात संयम ठेवावा लागेल, अन्यथा समस्या उद्‌भवू शकते. जर तुमच्या मालमत्तेशी संबंधित कोणताही खटला न्यायालयात सुरू असेल तर आजचा या प्रकरणात तुमच्या बाजूने निकाल लागेल. तुम्ही तुमच्या विरोधकांवर विजय मिळवाल. राजकारणात काम करणाऱ्या लोकांना मोठे पद आणि आदर मिळू शकतो. जर कुटुंबात परस्पर मतभेद असतील तर ते सोडवले जाऊ शकतात.

## वृषभ रास

➤ या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस आरोग्याच्या दृष्टीने कमकुवत राहणार आहे, म्हणून तुम्हाला तुमच्या आरोग्याकडे दुर्लक्ष करणे टाळावे लागेल. तुम्ही नवीन व्यवसाय सुरू करू शकता, परंतु आजचा भागीदारीच्या कामात अडचणी येण्याची शक्यता आहे, म्हणून आजचापासून भागीदारीचे काम सुरू करू नका. तुमचे मन एखाद्या गोष्टीबद्दल चिंतेत असेल. सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात काम करणाऱ्या लोकांनी काही मोठ्या फसवणुकीपासून सावध राहण्याची गरज आहे. तुम्हाला भूतकाळातील काही चुकांमधून धडा घ्यावा लागेल आणि तुमच्या भावनांवर नियंत्रण ठेवावे लागेल. कामाच्या संदर्भात तुमचा प्रवास आजचा यशस्वी होईल.

## मिथुन रास

➤ या राशीसाठी आजचा दिवस खूप शुभ राहणार आहे. तुम्हाला नवीन वाहन मिळू शकते. तुम्ही तुमच्या कुटुंबातील सदस्यांसह कोणत्याही शुभ समारंभात सहभागी होऊ शकता. मुलांशी तुमचा चांगला समन्वय असेल आणि तुम्ही त्यांच्या शिक्षणात त्यांना पाठिंबा द्याल. तुमच्यासाठी नवीन कामात गुंतवणूक करणे चांगले राहील. तुमच्या मनात असलेल्या समस्यांबद्दल तुम्ही वरिष्ठ सदस्यांशी बोलू शकता आणि त्यांच्याकडून तुम्हाला योग्य उपाय मिळतील. आईचा कोणताही जुना आजार पुन्हा उद्‌भवू शकतो ज्यामुळे त्रास होईल. सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात काम करणाऱ्या लोकांनी काही मोठ्या फसवणुकीपासून सावध राहण्याची गरज आहे.

## कर्क रास

➤ या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस कायदेशीर बाबींमध्ये चांगला राहणार आहे. तुम्हाला उत्पन्नाचे नवीन स्रोत मिळतील. कुटुंबातील लोक तुमच्या शब्दांचा आदर करतील, ज्यामुळे तुम्ही समाधानी राहाल आणि काहीतरी खास करण्याची इच्छा प्रबळ राहील. आजचा तुम्ही तुमच्या कुटुंबाच्या आनंदासाठी काही भौतिक वस्तू खरेदी करू शकता. कोणत्याही अनोळखी व्यक्तीच्या प्रभावात येऊ नका, अन्यथा तो तुम्हाला फसवू शकतो. तुम्हाला भूतकाळातील काही चुकांमधून धडा घ्यावा लागेल आणि तुमच्या भावनांवर नियंत्रण ठेवावे लागेल. कामाच्या संदर्भात तुमचा प्रवास आजचा यशस्वी होईल.

## सिंह रास

➤ या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस अचानक लाभदायक असेल. पण आजचा गाडी चालवताना त्यांना काळजी घ्यावी लागेल कारण दुखापत आणि अपघात होण्याची शक्यता आहे. व्यवसायात कोणासोबतही भागीदारीत कोणताही करार करू नका, अन्यथा तुमची फसवणूक होऊ शकते, असा सल्ला दिला जातो. तुम्हाला एखाद्या गोष्टीची काळजी असेल. आजचा तुम्हाला तुमच्या बोलण्यावर नियंत्रण ठेवावे लागेल, अन्यथा तुमचा प्रियकर एखाद्या गोष्टीने नाराज होऊ शकतो. तुम्हाला काही कामासाठी थोडे अंतर प्रवास करावे लागू शकते. मुलांच्या लग्नातील अडथळे दूर होतील.

## कन्या रास

➤ या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस तुमच्यासाठी थोडा गोंधळात टाकणारा असेल. मानसिक अस्वस्थतेमुळे तुम्हाला निर्णय घेण्यात अडचण येईल. परस्पर भांडणांमुळे कुटुंबातील वातावरण बिघडू शकते. तुमच्या मनात एखाद्या गोष्टीची भीती असेल, ज्यामुळे तुम्ही चिंतेत राहाल. आजचा एखाद्या स्पर्धेत यश मिळाल्याने विद्यार्थ्यांना आनंद होईल. नोकरी करणाऱ्या लोकांवर कामाचा ताण जास्त असेल, परंतु तरीही वरिष्ठांच्या मदतीने ते वेळेवर काम पूर्ण करतील. वैवाहिक जीवन तुमच्या जोडीदाराची तब्येत ठीक नसेल तर आजचा ती सुधारेल.

## तूळ रास

➤ आजचा, तूळ राशीसाठी फायदेशीर राहील आणि आदर वाढेल. तुम्हाला वाहनाचे सुख मिळेल, जे लोक वाहन खरेदी करण्याचा विचार करत आहेत त्यांच्यासाठी आजचा दिवस या बाबतीत अनुकूल असेल. कुटुंबातील एखाद्या सदस्याला तुम्ही बोललेल्या गोष्टीबद्दल वाईट वाटू शकते, ज्यामुळे तो रागावू शकतो. तुमच्या अभ्यासाशी संबंधित काही प्रकरणे सोडवली जात आहेत असे दिसते. खूप दिवसांनी जुना मित्र भेटून तुम्हाला आनंद होईल. कुटुंबातील सदस्यांकडून अपेक्षित सहकार्य मिळू शकेल. एखादा जुना मित्र खूप दिवसांनी तुम्हाला भेटायला येऊ शकतो.

## वृश्चिक रास

➤ आजचा तुमच्यासाठी प्रगतीचा मार्ग मोकळा करेल. व्यवसायात नफा मिळाल्यानंतर तुम्ही आनंदी व्हाल. एखाद्याकडून ऐकलेल्या गोष्टीवरून वाद घालू नका, अन्यथा तुमचे नुकसान होऊ शकते. पैशाशी संबंधित कोणताही विषय तुम्हाला त्रास देऊ शकतो. आर्थिक बाबींमध्ये तुम्ही मित्रांकडून सल्ला घेऊ शकता परंतु इतर कोणाच्याही प्रभावाखाली कोणताही निर्णय घेऊ नका अन्यथा तुमचे नुकसान होऊ शकते. विद्यार्थ्यांसाठी उच्च शिक्षणाचा मार्ग मोकळा होईल. विद्यार्थ्यांना शिक्षणात येणाऱ्या समस्यांबद्दल त्यांच्या शिक्षकांशी बोलावे लागू शकते. ज्येष्ठांचे मार्गदर्शन तुमच्यासाठी फायदेशीर ठरेल.

## धनु रास

➤ आजचा दिवस तुमच्यासाठी सामान्य असेल. तुम्हाला तुमच्या विरोधकांपासून सावध राहावे लागेल. अनावश्यक अडचणीत पडणे टाळावे आणि स्वत:च्या कामात लक्ष द्यावे. जर तुम्ही दुसऱ्यांच्या बाबतीत ढवळाढवळ केली तर तुम्ही अडचणीत येऊ शकता. जर तुमच्या तब्येतीत काही बिघाड झाला असेल तर आजचा ती सुधारेल. कुटुंबातील सदस्यांकडून अपेक्षित सहकार्य मिळू शकेल. एखादा जुना मित्र खूप दिवसांनी तुम्हाला भेटायला येऊ शकतो. खूप दिवसांनी जुना मित्र भेटून तुम्हाला आनंद होईल. तुम्हाला काही कामासाठी थोडे अंतर प्रवास करावे लागू शकते. मुलांच्या लग्नातील अडथळे दूर होतील.

## मकर रास

➤ या दिवस तुमच्यासाठी गोंधळात टाकणारा असू शकतो. तुमचे मन एखाद्या गोष्टीबद्दल चिंतेत असेल. कुटुंबातील एखाद्या सदस्याकडून तुम्हाला काही चांगली बातमी ऐकायला मिळू शकते. आजचा तुम्ही तुमच्या कामाच्या व्यवसायात काही बदल कराल परंतु आजचा कोणतेही धोकादायक पाऊल उचलू नका. आजचा तुम्हाला तुमच्या बोलण्यावर नियंत्रण ठेवावे लागेल, अन्यथा तुमचा प्रियकर एखाद्या गोष्टीने नाराज होऊ शकतो. तुम्हाला काही कामासाठी थोडे अंतर प्रवास करावे लागू शकते. मुलांच्या लग्नातील अडथळे दूर होतील.

## कुंभ रास

➤ या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस चांगला राहणार आहे. व्यवसायात, तुम्हाला मागील योजनांमधून चांगले फायदे मिळू शकतात, ज्यामुळे तुम्हाला आनंद होईल. जर तुमचे कोणतेही प्रलंबित काम तुम्हाला बऱ्याच काळापासून त्रास देत असेल तर तेही पूर्ण होऊ शकते. जर तुम्हाला कोणत्याही शारीरिक समस्येमुळे त्रास झाला असेल तर तुम्हाला त्यातही आराम मिळत असल्याचे दिसून येते. विद्यार्थ्यांना शिक्षणात येणाऱ्या समस्यांबद्दल त्यांच्या शिक्षकांशी बोलावे लागू शकते. ज्येष्ठांचे मार्गदर्शन तुमच्यासाठी फायदेशीर ठरेल. पैशाशी संबंधित कोणताही विषय तुम्हाला त्रास देऊ शकतो.

## मीन रास

या राशीसाठी आजचा दिवस चैनीच्या वस्तूंमध्ये वाढ आणणारा आहे. तुम्ही तुमच्या आयुष्यात एक मोठा निर्णय घेऊ शकता आणि वरिष्ठ सदस्य तुमच्या बोलण्याने खूश होतील. तुमच्या जोडीदाराकडून तुम्हाला भेटवस्तू मिळू शकते. तुमच्या पालकांच्या आशीर्वादाने तुम्ही आजचा यशाकडे वाटचाल कराल. आजचा व्यवसायात तुमची कमाई चांगली असेल. नोकरी करणाऱ्या लोकांवर कामाचा ताण जास्त असेल, परंतु तरीही वरिष्ठांच्या मदतीने ते वेळेवर काम पूर्ण करतील. वैवाहिक जीवन तुमच्या जोडीदाराची तब्येत ठीक नसेल तर आजचा ती सुधारेल. तुम्हाला काही कामासाठी थोडे अंतर प्रवास करावे लागू शकते.

# छोट्याशा आनंदाची गरज



सहजपणे आपण कोणाला दिलेला मदतीचा हात किंवा थोडासा वेळ खूप काही शिकवून जातो. आपण केलेल्या छोट्याशा समाजकार्यातून आपल्याला पुण्य लाभेल आणि आपला तो दिवस सार्थकी लागल्याचे समाधान मिळेल!

आज मी बाहेर पडताना, एका वयस्कर बाईने आमच्या सोसायटीच्या गेटवर फूल विकणाऱ्या एका बाईला एक मलम आणून दिला आणि तिला सांगितले की, "कपाळावर ते मलम लाव." बरं वाटेल. मी पाहतच राहिले. या फुलवालीच्या डोक्याला पाटी उतरवताना जबरदस्त मार लागून, टेंगूळ आलेले होते. ते दुखत होते, हे तिच्या चेहऱ्यावरून स्पष्ट दिसत होते. ते टेंगूळ खरं तर इतके दिसण्यासारखे होते की, जाता-येता प्रत्येकाला दिसले असेलच. पण नेमकं या बाईला तिच्या त्या टेंगुळाला लावण्यासाठी ट्यूब द्यावीशी वाटली!



### मनात पिंगा घालत असतात

संध्याकाळी फेरफटका मारण्यासाठी घराबाहेर पडत होते. सोसायटीच्या गेटवर एक फुलवाली नेहमीच हार-फुले विकत असते. त्या बाईकडे पाहिल्यावर माझ्या नेहमी मनात येते की, ही बाई तिचा संसार कसा सांभाळत असेल? तिचा नवरा दारूडा आहे आणि मुलगा घर सोडून गेलेला आहे, ही गोष्ट मला माहीत आहे. माझ्या मनात आले की, जर शंभर माणसं तिच्यासमोरून जात असतील, तर त्यातला एक तरी माणूस फुलं घेत असेल का? नाही. मग साधारण पाचशे ते हजार माणसे समोरून गेल्यावर, एखादा माणूस फुलं घेत असेल, असा अंदाज करूया. दहा ते पंधरा रुपयांचा गजरा किंवा एखादा वीस रुपयांचा हार घेतल्यावर त्यामागे तिला नेमके किती पैसे मिळत असतील? किती तास बसल्यावर तिची, किती फुलं विकली जात असतील किंवा न विकलेली फुलं दुसऱ्या दिवशी कोमेजून जात असतील त्याचे किती नुकसान होत असेल. ज्या दिवशी ही बाई आजारी पडते किंवा नातेवाइकांच्या-घरगुती कार्यक्रमात असते, त्या दिवशी तिची विक्री कशी होत असणार? ही फुलं विक्रीसाठी ती किती दुरुन आणत असेल? गजरे-हार गुंफत असताना तिची नजर कशी गिऱ्हाईकांवर टिकून असेल? किती तरी प्रश्न माझ्या मनात पिंगा घालत असतात.

आपण म्हणतो की, समाजकार्य केले पाहिजे किंवा काही लोक दावा करतात की, आम्ही खूप समाजकार्य करतो. पण ही घटना पाहिल्यावर, मला असे वाटले की, हे सुद्धा एक समाजकार्य नव्हे का? त्या टेंगुळासाठी ती फुलवाली निश्चितपणे कोणत्याही डॉक्टरकडे जाणार नव्हती किंवा स्वत:हून मेडिकलमध्ये जाऊन त्याला लावण्यासाठी औषध घेणार नव्हती. तिचे टेंगूळ तसेही बरे झाले असते, पण कदाचित या मलममुळे तो लवकर बरा होईल किंवा मलम लावल्यामुळे आणि ते मुख्यत्वे कोणी तरी स्वत: विकत घेऊन दिल्यामुळे तिला वेगळे मानसिक समाधान मिळेल, जे मला वाटते फार महत्त्वाचे आहे. मग मी मला या प्रसंगात स्वत:ला ठेवून पाहिले की, मी तिच्या पुढून जाताना माझे तिच्याकडे लक्ष गेले असते का? लक्ष गेले असते तरी मला टेंगूळ दिसले असते का? आणि त्याहून महत्त्वाचे म्हणजे, त्या टेंगुळाला लावण्यासाठी समोरच्या मेडिकलमधून मी कोणते तरी मलम तिला आणून दिले असते का? असे प्रश्न माझ्या मनात उभे राहिले.

### समाधान लाभेल

हा प्रसंग लिहिताना जाणवते की, अशी जगात अनेक माणसे असतात, त्यांना छोट्याशा आनंदाची गरज असते किंवा आपल्या उपकाराची म्हणा ना; परंतु ते समजून घेण्याची आपली कुवत नसते किंवा दानत नसते. फक्त या प्रसंगानंतर आपण (मी सुद्धा) लक्षात घेऊया की, सहजपणे आपल्याला कोणाला मदतीचा हात देता आला किंवा थोडासा वेळ देता आला तर तो देऊया जेणेकरून थोडेसे समाजकार्य केल्याचे आपल्याला पुण्य लाभेल आणि आपला तो दिवस सार्थकी लागल्याचे समाधान लाभेल!

**प्रा. प्रतिभा सराफ**

# कुकरच्या शिट्टीतून फसफसून पाणी येतं?

महिला वर्गाचं स्वयंपाक घरातील भांड्यांवर विशेष प्रेम असतं. भांडी व्यवस्थित आणि चांगली रहावीत असं प्रत्येकीला वाटतं. जेवण बनविण्यासाठी सर्वात जास्त स्वयंपाकघरात वापर होत असेल तर तो म्हणजे प्रेशर कुकरचा. पण कित्येकदा कुकर वापरताना काही समस्यांचाही सामना करावा लागतो. कधी कुकरची शिटी वाजत नाही, कधी शिटी किंवा झाकणातून पाणी-अन्न बाहेर येते, तर कधी अन्न अतिप्रमाणात शिजते अथवा शिजतच नाही. या सर्व समस्यांपासून दूर करण्यासाठी आपण काही सोप्या टिप्स जाणून घेऊया.



### कुकरमधून पाणी का बाहेर येते?

कुकरमध्ये क्षमतेपेक्षा अधिक पदार्थ ठेवल्यास पाणी बाहेर येते. लहान कुकरसाठी तुम्ही मोठा गॅस बर्नर वापरत असल्यास कुकरमधून पदार्थ बाहेर येतात. घटकांच्या वजनाच्या आधारावर आवश्यक असलेल्या इष्टतम पातळीपेक्षा द्रव जास्त भरल्यास, त्याचा परिणाम झाकणाच्या वरती ओव्हरफ्लो होतो. प्रेशर कुकर कधीही अर्धा किंवा तीन चतुर्थांशपेक्षा जास्त भरू नका.

### हे सोपे उपाय करा ट्राय :

● कुकरची शिट्टी नीट व्हावी यासाठी कुकरचे झाकण व्यवस्थित साफ करणे आवश्यक आहे. त्यात अन्न अडकले तर शिट्टी नीट होत नाही. ● कुकरमध्ये कोणतेही अन्न ठेवण्यापूर्वी त्याचे रबर नक्की तपासा. कुकरच्या रबरला थोडं तेल लावून ती रिंग झाकणात बसवून झाकणं बंद करावं. यामुळे वाफ बाहेर जाणार नाही.

● कुकरचे झाकण बंद केल्यानंतर झाकणावर संपूर्ण बाजूला कणीक लावू शकता. असे केल्यास तुम्ही कुकरमधून पाणी, अन्न बाहेर येण्यापासून रोखू शकता. ● कुकर जुना झाल्यावर त्यातून पाणी बाहेर येऊ लागते. तेव्हा काही वर्ष एकच कुकर वापरून तो जुना झाल्यावर तो बदलणे नेहमी फायदेशीर ठरते. ● जर तुम्ही लहान प्रेशर कुकरमध्ये डाळ शिजवत असाल तर सुरुवातीपासूनच गॅसची फ्लेम मोठी ठेऊ नका. असे केल्याने अति उष्णतेमुळे शिटीतून पाणी येऊ लागते.

● जर तुमच्या कुकरमधून पाणी येत असेल आणि तुम्हाला ते पसरण्यापासून रोखायचे असेल, तर झाकणावर एक ते दोन इंच अंतर ठेवून एक ओला टिश्यू किंवा टॉवेल शिट्टीभोवती गुंडाळा. त्यामुळे पाणी सर्वत्र पसरणार नाही. ● कुकरच्या शिट्टीमध्ये धूळ जमून जाते किंवा अन्नाचे कण जमतात. यामुळे काही वेळेस शिट्टी होत नाही किंवा शिट्टीमधून पाणी बाहेर येते. याकरिता प्रेशर कुकरची शिट्टी नियमित स्वच्छ करावी.

# आगरी कोळी कराडी भंडारी कुणबी ओबीसीनो, आरक्षणासाठी राष्ट्रीय लढा उभारा -राजाराम पाटील

ओबीसींच्या हक्कांच्या मंडल आयोगासाठी देशात लढा उभा करणारे माजी खासदार लोकनेते दि बा पाटील यांच्या नवी मुंबई विमानतळ नामकरण आंदोलनात आता भिवंडीचे आगरी ओबीसी खासदार सुरेश म्हात्रे यांनी आक्रमक पवित्रा घेतला आहे. नवी मुंबई विमानतळाच्या उद्‌घाटनाची प्रक्रिया अंतिम टप्प्यात असतानाच, त्याला माजी खासदार दि बा पाटील यांचे नाव देण्याच्या मागणीला ताकद देण्यासाठी आज भव्य कार रॅलीचे आयोजन करण्यात येत आहे. सुरवातीस उरण पनवेल या लोकनेते दि बा पाटील यांच्या कर्मभूमीतून सुरू झालेले आगरी कोळी कराडी बारा बलुतेदार यांचे आंदोलन आता ठाणे जिल्ह्यातून सुरू झाले आहे. ही अत्यंत अभिनंदनीय घटना ठरत आहे. लोकनेते दि बा पाटील यांचा विचार हा हिंदू धर्माने गुलाम, शोषित, वेठबिगार, भूमिहीन कुळे यांच्या
जमीन, पाणी, जंगल, शिक्षण आरक्षण यांच्या अधिकारांचा विचार आहे. मुंबई ठाणे रायगड पालघर परिसरात वाढत असलेल्या उच्चवर्णीय हिंदुत्वाचा पराभव करण्याची शक्ती आगरी कोळी ओबीसी आंदोलनात आहे. दोन दिवसापूर्वी जसखार उरण येथे घेतलेल्या आगरी कोळी कराडी ओबीसी बांधवांच्या आरक्षण जागृती सभेत उत्तम प्रतिसाद मला मिळाला.

लोकांना ओबीसी आरक्षण हे हिंदू धर्माच्या चातुर्वर्ण्याच्या शूद्र शोषणास उत्तर, म्हणून ओबीसी जातींना न्याय देण्याचे धोरण आहे. ओबीसी आरक्षण म्हणजे सामाजिक न्यायाचे ओबीसी प्रतिनिधित्व धोरण आहे. हे समजविण्यात ओबीसी नेतृत्व कमी पडले आहे. हिंदुत्ववादी प्रचारकांनी तुमचे शत्रु हे मुस्लिम आहेत. उच्चवर्णीय हिंदू ब्राह्मण क्षत्रिय वैश्य नाहीत. असे आगरी कोळी कराडी ओबीसींच्या मनावर ठसविले आहे. त्यामुळे ओबीसी आरक्षण लढाईस आर्थिक मदत ओबीसींकडून मिळत नाही. ओबीसी जागृतीची सभा उरण मध्ये होतेय याची नोंद पोलिस प्रशासनाने तत्काळ घेतली. बेताल वक्तव्य करणाऱ्या जरांगे सारख्या आरक्षणाचा "आ" न कळणाऱ्या मराठा आंदोलनास मुंबईत परवानगी नसताना, सरकार कडून सर्व पद्धतीने समर्थन देण्यात आले. मुंबईची वाहतूक अर्थ व्यवस्था अडचणीत आणणारे, संविधान विरोधी, मराठा आरक्षणाची मागणी करणारे, हे बेकायदेशीर आंदोलन मुंबई बाहेर रोखणे गरजेचे होते.

लोकनेते दि बा पाटील यांच्या नवी मुंबई विमानतळ नामकरणास खरा विरोध आगरी कोळी कराडी ओबीसी बांधवांच्या ठाणे जिल्ह्यातून झाला आहे. साताऱ्यातून आलेल्या मराठा एकनाथ शिंदे यांनी शिवसेनेतून मोठे होत आगरी कोळी ओबीसींवर सत्ता गाजविण्यास कशी सुरुवात केली? हे



येथील विद्यमान वनमंत्री गणेश नाईक यांना कळले नाही. आज ते एकनाथ शिंदे यांचा गर्व उतरविण्याचा संकल्प करीत आहेत. तोच मनुस्मृतीने उभा केलेला उच्चवर्णीय भयंकर राजकीय चक्रव्यूह आहे. ओबीसी त्यात जगतोय की मरतोय अशी आजची स्थिती आहे. वनमंत्री गणेश नाईक ब्राह्मण क्षत्रिय वैश्य अर्थात फडणवीस शिंदे लोढा या मनुवादी शत्रूंनी घेरले गेले आहेत. यात ओबीसी विचार म्हणजेच फुले शाहू आंबेडकर हेच त्यांना वाचवू शकतात.

एकनाथ शिंदे यांनी आपली सरंजामी मराठा सत्ता शिवसेनेतून ठाण्यात लादताना, कुटनितीने हिंदू हृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे यांचे नाव नवी मुंबई विमानतळास देण्याचा ठराव घेतला. एकनाथ शिंदे यांच्या ताब्यातील, नगर विकास खात्याच्या अंकित असणाऱ्या सिडको हीच आगरी कोळी गावठाणांचा शत्रू आहे. जागृत आगरी कोळी कराडी बांधवांनी ही मराठा अरेरावी रोखत याला विरोध केला. सत्तेच्या शेवटच्या दिवशी माजी मुख्यमंत्री उद्धवजी ठाकरे यांनी आपल्या वडिलांचे नाव, (हिंदू हृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे) यांचे नाव मागे घेण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला. या घटनेचा साक्षीदार मी स्वत: होतो. त्यासाठी शिवसेनेचे नेते. (आगरी नेते) सन्माननीय बबन दादा पाटील यांना मी कायम धन्यवाद देईन.

नवी मुंबई विमानतळ प्रकल्पास मा बाळासाहेब ठाकरे यांचे नाव देण्याचा एकनाथ शिंदे यांचा निर्णय हा, शिवसेनेच्या स्थापनेत पायाचे भक्कम चिरे असलेल्या, आगरी कोळी कराडी भंडारी शाखाप्रमुख विभागप्रमुख, ओबीसींच्या विरोधी असल्याचे सत्य मां उद्धवजींनी समजून घेतले.

ही फार मोठी गोष्ट आहे. महाराष्ट्राच्या कोणत्याही राजकीय पक्षात सत्ताधारी मराठा ब्राह्मण वैश्य हे ८५ टक्के ओबीसी एससी एसटी यांच्या विरोधात असतात. हे माजी मुख्यमंत्री मनोहर जोशी (ब्राह्मण) आणि नारायण राव राणे, (मराठा) यांनी उद्धवजींच्या चांगलेच लक्षात आणून दिले आहे. याच उच्चवर्णीय सत्ताधारी जातींनी शिवसेना चोरली, फोडली, उध्वस्त केली.

खऱ्या शिवसेनेचे प्रमुख उद्धवजी बाळासाहेब ठाकरे यांनी आपल्या वडिलांचे नाव मागे घेऊन विमानतळाच्या सातबाऱ्यावर एकनाथ शिंदे यांनी चढविलेल्या बाळासाहेबांच्या नावाची नोंद हक्क सोड पत्र देऊन काढली.

महाराष्ट्राच्या इतिहासात मुख्यमंत्री म्हणून उद्धवजी ठाकरे यांचा हा निर्णय आगरी कोळी ओबीसी लोकांच्या अधिकारातील लोकनेते दि बा पाटील या आमच्या नेतृत्वासाठी महत्वाचा निर्णय होता. ओबीसींच्या विचारात हिंदुत्वाचा पराभव करण्याची ताकद आहे. महाराष्ट्रातील ओबीसींच्या नेतृत्वाने नोंद घ्यावी. असा हा निर्णय आहे.

सुरवातीस नामकरण आंदोलनास भाजपतील आगरी कोळी कराडी नेतृत्वाने उचलून धरले होते. परंतु ते आंदोलन उद्धवजी ठाकरे यांनी आपल्या वडिलांचे नाव मागे घेतल्याने, आता भाजपाच्या अंगलट आले आहे. "नाव आम्हीच देऊ" या भाजपाच्या आश्वासनावर विश्वास ठेवायला आक्रमक आगरी कोळी कराडी ओबीसी तयार नाहीत.

सरकार म्हणून लोकनेते दि बा पाटील यांच्या सिडको प्रकल्पग्रस्तांना पुनर्वसनाच्या साडे बारा टक्के आणि विमानतळाच्या पुनर्वसनाचे अधिकार देण्यात उद्धवजींचे आणि फडणविसांचे सरकार सपशेल अपयशी ठरले आहे. कारण सिडको नगर विकास खाते ओबीसी विरोधी मराठा एकनाथ शिंदे यांच्याकडे राहिले आहे. नगरविकास खात्याच्या माध्यमातून महानगर पालिका सिडको येथे लूट मुंबई ठाणे रायगडाची होतेय. भाजपाने लोकसभा, विधानसभा निवडणुका जिंकूनही लोकनेते दि बा पाटील यांचे नाव का मिळत नाही? . म्हणून प्रकल्पग्रस्त तरुण नेते ॲड .विकास पाटील हे उच्च न्यायालयात गेले आहेत. आज ओबीसी नेते दि बा पाटील. जगन्नाथ कोठेकर, ॲड जनार्दन पाटील यांनी लढून मिळविलेल्या मंडल आयोगाच्या ओबीसी आरक्षणात मराठा घुसखोरी, कुणबी दाखल्यांच्या माध्यमातून सुरू आहे. शिंदे पवार फडणवीस या ब्राह्मण क्षत्रिय सत्तेतून हा ओबीसी आरक्षण संपविण्याचा हा डाव आजच्या आंदोलन कर्त्या ओबीसींना समजत नाही. वर्तमान आगरी कोळी कराडी तरुणाईची दिशाभूल करण्यात मराठा ब्राह्मण यांची मनुनिती यशस्वी झाली.

तशीच डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव घेऊन बामसेफ च्या वामन मेश्राम यांचेही योगदान आहे. मराठा कुणबी एकच आहेत.

सांज दैनिक बीड वास्तव
सायं. दैनिक बीड वास्तव हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक जितेंद्र कान्होजीराव सिरसाट** शुभेच्छा प्रिंटिंग प्रेस एमआयडिसी. बीड -४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून बीड वास्तव ऑफिस बशीर गंज चौक, बीड ४३११२२ (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. **संपादक - जितेंद्र कान्होजीराव सिरसाट, निवासी संपादक -अरविंद ओव्हाळ** (या अंकामध्ये छापलेल्या मजकूराशी मालक संपादक प्रकाशक सहमत असतीलच असे नाही) (वाद-विवाद बीड न्याय कक्षेत) मो. 9022952922

## विशेष

●पान १ वरून...

### विद्यार्थ्यांनी चांगला माणूस व्हावे-डॉ.हनुमंत सौदागर

श्री गायकवाड, श्री नाईकनवरे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून शुभेच्छा दिल्या. पुढे बोलतांना डॉ सौदागर यांनी विद्यार्थ्यांना स्वयंसिस्ती चे महत्व सांगितले. अध्ययन करत असताना अवधानाचे महत्त्व व सध्याच्या स्थितीमध्ये मुलांचे अवधान टिकवणे किती जिकरीचे झाले आहे याबद्दल मार्गदर्शन केले. अध्यक्षीय समारोप करताना श्री खोसे यांनी विद्यार्थ्यांना आपले ध्येय ठरवून त्या दिशेने मार्गक्रमण करण्यासाठी कसे प्रयत्नशील राहावे याबद्दल मार्गदर्शन केले. कार्यक्रम यशस्वीरित्या पार पडला कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रतीक कदम याने तर सर्व नियोजन नववीच्या विद्यार्थ्यांनी केले आभार श्रीमती उगले यांनी केले .कार्यक्रमास विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

●पान १ वरून...

### वरपगावाचे शिवराम पुरी मठसंस्थान भाविकांचे प्रेरणास्थान - आ. नमिता मुंदडा

सात दिवस दररोज सायंकाळी 7 ते 9 यावेळेत महाराष्ट्रातील नामवंत कीर्तनकारांची कीर्तनसेवा पार पडली. सात दिवस दररोज दुपारी 2 ते 5 यावेळेत अमृतवाणी कथेचे आयोजन करण्यात आले होते. दररोज दुपारी व सायंकाळी उपस्थित भक्तांसाठी येथे अन्नदानाची व्यवस्था मठ संस्थान व वेगवेगळे अन्न दाते यांच्या वतीने करण्यात आली होती.

सात फेब्रुवारी रोजी साप्ताहची सांगता मठ संस्थांनाचे विद्यमान मठाधीपती भगवान महाराज शास्त्री वरपगांवकर यांच्या काल्याच्या कीर्तनाने झाली. यावेळी अनेक महाराज सहीत आमदार नमिताताई मुंदडा यांच्यासह शिवसेना उबाठा गटाच्या उपनेत्या सुषमाताई अंधारे, राहुल सोनवणे, ऋषिकेश आडसकर, विजयप्रकाश ठोंबरे रत्नाकर शिंदे, सौरभ सोनवणे, सुनील गलांडे, किसनदादा कदम, विष्णू घुले, दादा ससाणे, पृथ्वीराज पाटील, प्रवीणकुमार शेप यांची उपस्थिती होती. मान्यवरांचा मठ संस्थानाच्या वतीने सत्कार करण्यात आला. कार्यक्रमानंतर उपस्थित लाखो भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. संस्थानाच्या वतीने सर्व ती अत्यावश्यक व्यवस्था करण्यात आली होती. चौकट : संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांनी यावेळी शुभेच्छा संदेश पाठवला होता. आपल्या शुभेच्छा संदेशात त्यांनी "केज तालुक्यातील वरपगावच्या मठ संस्थांनाचे कार्य खुप मोठे आहे. केवळ झगमगाट न करता अत्यंत पवित्र अध्यात्मिक प्रबोधनसेवेचे कार्य मठ संस्थान करत आहे .इच्छा असूनही आपण कार्यक्रमाला पोहोचू शकलो नाही मात्र लवकरच मठ संस्थांनाला भेट देणार आहे असे जरांगे पाटील म्हणाले.. रामकृष्ण महाराज याच्या जय जयकाराने वरपगाव नगरी दुम दुमली होते. नंतर अनेकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला यावेळी अनेकानी आपले दुकाने थाटली होती. एस टी मंहामडळाने बसेसची सोय केली होती. यावेळी भाविक भकंताचा महासागर दिसुन आला त्यानंतर दुसऱ्या दिवशी गावकर्यांनी हा परीसर स्वच्छता करून नवीन संदेश दिला.

●पान १ वरून...

### बीड जि प साठी भाजपची रणनीती ठरली; पंकजाताईंची बदामराव पंडितांनी घेतली भेट

निवासस्थानी भेट घेतली. त्यांच्या समवेत माजी अर्थ व बांधकाम सभापती युधाजित पंडित, माजी जि प सदस्य श्यामराव राठोड यांची उपस्थिती होती. नुकत्याच झालेल्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत भारतीय जनता पार्टीला घवघवीत यश मिळाल्याबद्दल ना पंकजाताई मुंडे यांचे माजी मंत्री बदामराव पंडित आणि माजी सभापती युधाजित पंडित यांनी पुष्पगुच्छ देऊन शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी निवडणुकीसह विविध विषयांवर सविस्तर सकारात्मक चर्चा झाल्याचे समजते.

# विहामांडवा जिल्हा परिषद गटात शिवसेनेचा तिहेरी विजय

## ➤ नितीन तांबे जिल्हा परिषद गटातून तर प्रमोद पन्हाळकर विहामांडवा गणातुन आणि प्रदीप नरके के. जळगाव गणातून विजयी





➤ **विहामांडवा/ इम्तीयाज शेख**
विहामांडवा जिल्हा परिषद गट आणि पंचायत समितीच्या निवडणुकीत शिवसेनेची दमदार कामगिरी करत विजयाची पताका फडकावली आहे. या निवडणुकीत विहामांडवा जिल्हा परिषद गटासह विहामांडवा आणि के.जळगाव या दोन्ही गणांवर शिवसेनेचे वर्चस्व सिद्ध केल्याने कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. या निवडणुकीत शिवसेनेच्या वतीने जिल्हा परिषद सदस्यपदी नितीन तांबे यांनी विजय मिळवला. तसेच, विहामांडवा पंचायत समिती गणातून प्रमोद पन्हाळकर आणि के.जळगाव गणातून प्रदीप नरके यांची सदस्यपदी निवड झाली.

### ➤ -विजयी उमेदवार

● सोमवारी (दि.९) झालेल्या मतमोजणीत खालील उमेदवार विजयी घोषित करण्यात आले 1 विहामांडला जिल्हा परिषद गट : शिंदेसेनेच्या नितीन तांबे यांनी भाजप पुरस्कृत भाऊसाहेब काळे यांचा 1378 मतांच्या फरकाने दणदणीत विजय मिळवला.

विहामांडवा पंचायत समिती गण : शिवसेनेचे प्रमोद पन्हाळकर यांनी राष्ट्रवादीचे बाबासाहेब नाचन यांचा 784 मतांनी विजयी झाले.

के.जळगाव पंचायत समिती गण : शिवसेनेचे प्रदीप नरके 1105 मतांनी विजयी झाले.

### कोणाला किती मते

विहामांडवा जिल्हा परिषद गटात शिलसेनेचे नितीन तांबे यांनी अतिशय अटीतटीच्या लढतीत बाजी मारली. नितीन तांबे यांना 6585 मते मिळाली, तर भाजप पुरस्कृत भाऊसाहेब काळे यांना 5207 मते मिळाली. तसेच राष्ट्रवादीचे विनोद तांबे यांना 4861, कॉंग्रेसचे बाबासाहेब पवार 630, अपक्ष उमेदवार संजना जाधव यांना 865, अपक्ष उमेदवार हरिपंडीत नवथर 312 मते मिळाली.

विजयाची अधिकृत घोषणा होताच विहामांडवा येथे शिंदे सेनेच्या कार्यकत्यांनी गुलालाची उधळण करत आणि ढोल-ताशांच्या गजरात विजयोत्सव साजरा केला. फटाक्यांच्या आतषबाजीने संपूर्ण परिसर दणाणून गेला होता. कार्यकत्यांनी एकमेकांना पेढे भरवून शुभेच्छा दिल्या.

नवनिर्वाचित सदस्यांनी मतदारांच्या विश्वासाला पात्र ठरत विहामांडवा व परिसराच्या सर्वांगीण विकासासाठी कटिबद्ध राहण्याची ग्वाही दिली.

यावेळी विहामांडवा सरपंच बप्पासाहेब येळे, माजी उपसरपंच सुनिल डुकरे, माजी सरपंच लहु डुकरे, उपसरपंच मुकेश सेठ काला, माजी सरपंच अफसर भाई शेख, शांताबाई नरवडे, ग्रा.पं.सदस्य पाडुरंग पवार, संजय कुलकर्णी, दिपक गाभूड, पंडित धायकर, राजेंद्र नरवडे, माजी पंचायत समिती सदस्या प्रज्ञाताई कुलकर्णी लहु गायकवाड, शिराज शेख यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# धारूर घाटातील मृत्यूचे वळण सुटणार?

## खामगाव–पंढरपूर राष्ट्रीय महामार्गावरील १२ किमी धोकादायक रस्त्याच्या रुंदीकरणासाठी पीडब्ल्यूडी लातूरची हालचाल

➤ **माजलगाव / अरविंद ओव्हाळ :**
खामगाव–पंढरपूर या राष्ट्रीय महामार्गावरील पारूर (धारूर) घाटासह सुमारे १२ किलोमीटरचा रस्ता अरुंद, वळणावळणाचा व अतिशय धोकादायक ठरला असून गेल्या काही वर्षांत येथे अपघातांचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले आहे. विशेषत: धारूर घाटातील सुमारे चार किलोमीटरचा डोंगराळ परिसर आणि त्यातील आठ ते नऊ तीव्र वळणे ही अपघातांची प्रमुख कारणे ठरत आहेत. या मार्गावरून जड वाहने, अवजड ट्रक व प्रवासी बसची सतत वाहतूक सुरू असल्याने वारंवार भीषण अपघात होत असून अनेक वाहनचालक व प्रवाशांना आपला जीव गमवावा लागला आहे. या पार्श्वभूमीवर सदर महामार्गाचा हा टप्पा सार्वजनिक बांधकाम विभाग (पीडब्ल्यूडी) लातूर यांच्या अखत्यारित वर्ग करण्यात आला असून, रस्ता रुंदीकरण व मजबुतीकरणासह दुरुस्तीच्या हालचालींना वेग आला आहे. याच अनुषंगाने रविवारी पीडब्ल्यूडी लातूर उपविभागाच्या अभियंते व तांत्रिक कर्मचाऱ्यांनी प्रत्यक्ष स्थळावर जाऊन घाटासह संपूर्ण १२ किलोमीटर रस्त्याचे सखोल सर्वेक्षण केले. धारूर घाट हा खामगाव–पंढरपूर महामार्गावरील अत्यंत महत्त्वाचा, मात्र तितकाच अपघातप्रवण टप्पा मानला जातो. अरुंद रस्ता, तीव्र चढ–उतार, घसरडी व धोकादायक वळणे, अपुरी संरक्षक भिंत, तसेच अनेक ठिकाणी तुटलेले कठडे यामुळे वाहनचालकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागतो. पावसाळ्यात व रात्रीच्या वेळी अपघातांचे प्रमाण अधिक वाढत असून, मागील काही वर्षांत येथे जड वाहनांचे अपघात होऊन अनेक वेळा वाहतूक ठप्प झाल्याच्या घटनाही घडल्या आहेत. रस्ता पीडब्ल्यूडी लातूरकडे वर्ग झाल्यानंतर विभागाने तत्काळ पावले उचलली असून, या सर्वेक्षणादरम्यान रस्त्याची सध्याची रुंदी, वळणांची तीव्रता, संभाव्य धोकादायक ठिकाणे, दुरुस्तीची आवश्यकता, संरक्षक भिंती, साईनबोर्ड, तसेच पाणी निचरा (ड्रेनेज) व्यवस्थेचा सविस्तर अभ्यास करण्यात आला. सर्वेक्षण पूर्ण झाल्यानंतर रस्ता रुंदीकरण व मजबुतीकरणासाठी आवश्यक असलेले अंदाजपत्रक तयार करून ते वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे मंजुरीसाठी सादर करण्यात येणार आहे. मंजुरी मिळाल्यानंतर तातडीने प्रत्यक्ष कामास सुरुवात केली जाणार असून, त्यामुळे अपघातांचे प्रमाण कमी होऊन वाहनचालकांना सुरक्षित व सुलभ प्रवासाची सुविधा उपलब्ध होईल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे. धारूर घाट व या मार्गावरील अपघातांचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर बनत असताना, पीडब्ल्यूडी लातूरकडून सुरू झालेल्या या हालचालींकडे स्थानिक नागरिक, वाहनचालक व प्रवासी आशेने पाहत आहेत. लवकरात लवकर काम सुरू करून हा महामार्ग सुरक्षित करण्यात यावा, अशी ठाम मागणी नागरिकांकडून होत आहे.





धारूर घाटातील अरुंद वळणांचा धोकादायक रस्ता – अपघातप्रवण ठिकाणी पीडब्ल्यूडी लातूरच्या अधिकाऱ्यांकडून पाहणी.

## महा जम्बो शब्दकोडे

| | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | | ३ | ४ | | ■ | ५ | ६ | ■ | ७ | ८ | ■ | ९ | |
| १० | | ■ | ११ | | ■ | १२ | | | १३ | | | १४ | | ■ |
| | ■ | १५ | ■ | १६ | १७ | | | ■ | १८ | | ■ | | ■ | १९ |
| २० | २१ | | | ■ | | ■ | २२ | | ■ | २३ | | ■ | २४ | |
| ■ | २५ | | ■ | २६ | ■ | २७ | | ■ | २८ | | ■ | २९ | | |
| ३० | | ■ | ३१ | | ३२ | ■ | ■ | ३३ | | | ३४ | ■ | | ■ |
| ३५ | | | ■ | ३६ | | ३७ | | ■ | | ■ | ३८ | ३९ | ■ | ४० |
| ४१ | | ■ | ४२ | ■ | ४३ | | ■ | ४४ | ■ | ४५ | | | | |
| | ■ | ४६ | | ४७ | ■ | ४८ | ४९ | | | ■ | ■ | | ■ | |
| ५० | ५१ | ■ | ५२ | | ५३ | ■ | ५४ | | ■ | ५५ | ५६ | ■ | ५७ | |
| ५८ | | ■ | | ■ | ५९ | ६० | ■ | ■ | ६१ | ■ | ६२ | | | ■ |
| ■ | ६३ | | ■ | ६४ | | | ६५ | ६६ | ■ | ६७ | | ■ | ६८ | |
| ६९ | | ■ | ७० | ■ | | ■ | ७१ | | ७२ | ■ | ७३ | ७४ | | ■ |
| | ■ | ७५ | | | ■ | ७६ | ■ | ७७ | | ७८ | ■ | | ■ | ७९ |
| ८० | | | | ■ | ८१ | | | | ■ | ८२ | | | | |

### आडवी विधाने

१. देव आनंद, साधना यांचा सुपरहिट चित्रपट
५. मेलेला, ठार
७. मेळ, जुळणी
९. नोकर, सेवक
१०. गळ्यामागील भाग, सत्कार
११. एक हजार किलोचे वजन
१२. राजेश खन्ना, रेखा, राज बब्बर यांचा चित्रपट
१६. शशी कपूर, आशा पारेख यांचा चित्रपट
१८. पोपट, कीर, राघू
२०. सहा धावांचा क्रिकेटमधील फटका
२२. कुबेराचा सेवक
२३. वजनदार
२४. कापरे, थरथर
२५. भारलेला, ताब्यात आलेला
२७. दुर्दशा, वाईट अवस्था
२८. संजय दत्तची प्रभावी भूमिका असलेला चित्रपट
२९. मूषक
३०. किल्ल्याभोवतीची मजबूत भिंत
३१. दानशूर, मोठ्या मनाचा
३३. लाकूड कापण्याचे हत्यार
३५. नूतन, नवा
३६. तलवार
३८. कर, हस्त
४१. अभिप्राय
४३. अंगावरील बारीक मऊ केस
४५. खानेसुमारी, शिरगणती
४६. अज, बकरा
४८. शेंगेचे कवच
५०. धरित्री, पृथ्वी
५२. एका पक्ष्याचे नाव
५४. बाण, शर
५५. नाडी, शीर, धमनी
५७. अजगर
५८. पर्वत; जिन्नस
५९. इटलीची राजधानी
६१. सौभाग्यवतीचे संक्षिप्त रूप
६२. मंडप
६३. वडीलभाऊ; विनोद मेहराचा चित्रपट
६४. कोषाध्यक्ष
६७. दुःख, वेदना
६८. झाड, वृक्ष
६९. बकऱ्याचे कमावलेले कातडे
७१. युद्ध, रण
७३. दोरी, दोर
७५. सफेद, पांढरा
७७. जमिनीवर अंथरण्याचे जाडजूड बिछाईत
८०. लोणी
८१. अवहेलना, मानखंडना
८२. धर्मेंद्र-जीतेंद्र जोडीचा हिट चित्रपट

### उभी विधाने

१. उत्तर कुमार, शर्मिला टागोर यांचा चित्रपट
२. वर्ष, साल
३. नाटक-सिनेमात काम करणारा पुरुष
४. सोने, सुवर्ण
५. हरिणाच्या डोळ्यांसारखे डोळे असलेली सुंदर स्त्री
६. होडी, मचवा, नाव
७. मोर्चेबांधणी, एकत्र करणे
८. प्रतिबंध, बंदी (हिंदी)
९. 'शुक्रतारा' हा कार्यक्रम सादर करणारे गायक - अरुण **
१२. अभिनय, नट्टाफट्टा
१३. पक्ष्याच्या डोक्यावरील शेंडी
१४. यज्ञ, यजन
१५. गगन, नभ
१७. योग्य निर्णय, निवाडा
१९. मडक्याचा तुकडा
२१. ताजा, प्रफुल्लित
२४. फाणस, लालटेन
२६. नाराज, निराश
२८. कळलाव्या; ब्रह्मदेवाचा मानसपुत्र
३०. शरीर - अंतःकरण-पैसा इत्यादी सर्वस्व
३२. फाशांवरून शकुन पाहण्याची विद्या
३४. तृष्णा
३७. अंत, अखेर, समाप्ती
३९. धट्टाकट्टा, मजबूत, बळकट
४०. श्वापद, पशू
४२. तोटा, हानी
४४. राजेश खन्ना, शर्मिला टागोर, फिरोज खान यांचा चित्रपट
४७. भीती, भय
४९. एक हिंदी अभिनेत्री - ** अग्निहोत्री
५१. गायन म्हणण्याची विशिष्ट धाटणी, शैली
५३. भारताच्या पहिल्या महिला राज्यपाल - **** नायडू
५६. परस्परांपासून सारख्या अंतरावर असलेला
५७. आमंत्रण, बोलावणे
६०. अंतःकरण
६५. नोकर, सेवक
६६. अरबी वर्षाचा नववा महिना
६९. नेत्र, डोळे
७०. आर्थिक सामर्थ्य
७२. धुळीचा कण, रेणू
७४. मुस्लिमांचा नमस्कार
७५. पती, मालक, कारभारी
७६. कढवलेले लोणी
७८. मकरंद
७९. पराक्रमी, लढवय्या

### महा जम्बो शब्दकोडे कालचे उत्तर

| | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| व | सं | त | का | ने | ट | क | र | ■ | धु | ■ | टो | क | दा | र |
| सा | ग | र | ■ | म | ■ | स | ई | प | रां | ज | पे | ■ | दा | स |
| ■ | न | ■ | द | ■ | वा | र | स | ■ | डे | रा | ■ | लू | ■ | वं |
| अ | म | री | श | पु | री | ■ | ■ | म | ■ | सं | क | ट | ■ | ती |
| ना | त | ■ | र | त | ■ | चौ | क | शी | ■ | ध | ■ | मा | घ | ■ |
| थ | ■ | र | थ | ■ | मा | का | ■ | द | र | ■ | खा | र | ■ | क |
| ■ | मो | द | ■ | क | ल | र | व | ■ | वा | ट | प | ■ | त | म |
| मे | ह | न | त | ■ | व | ■ | जी | व | न | ■ | र | ख | वा | ला |
| ह | र | ■ | ■ | क | ण | ख | र | ■ | गी | त | ■ | रू | ■ | ■ |
| बू | ■ | स | व | ड | ■ | प | ■ | उ | ■ | ग | र | ज | वं | त |
| ब | र | खा | स्त | ■ | रा | ■ | उ | दा | ह | र | ण | ■ | श | र |
| ■ | त्न | ■ | रा | ज | धा | नी | ■ | स | ल | ■ | जी | व | ■ | बे |
| न | मा | ज | ■ | न्म | ■ | ल | ग्न | ■ | का | ■ | त | र | बे | ज |
| क | ला | का | र | ■ | ना | म | ■ | भी | ■ | अ | ■ | पा | ■ | ■ |
| ली | ■ | त | ग | म | ग | ■ | स | म | ज | दा | र | ■ | शो | ध |

विशेष

## इस्रोच्या भेटीसाठी अर्जुन पवारची निवड

### अति दुर्गम भागातील मौजे तांदळा गावाचा आदर्श ठरला अर्जुन पवार

माहूर : जावेद शेख




माहूर तालुक्यातील अतिदुर्गम डोंगरदऱ्यात वसलेल्या तसेच एकेकाळी नक्षल चळवळीने गाजलेल्या मौजे तांदळा येथील अर्जुन पवार याची राज्यस्तरीय निवड परीक्षेतून बेंगलोर येथील भारतीय अवकाश संशोधन संस्था इस्रोला भेट देण्यासाठी निवड झाल्याने अर्जुन पवार यांचे गावकऱ्यासह तालुका भरातून अभिनंदन होत आहे

वडिलांचे छत्र हरवलेल्या अर्जुन नारायण पवार याची आई मोलमजुरी करते तर मोठा भाऊ बारावीत शिक्षण घेत आहे शिक्षणाची आवड असल्याने आई मालाबाई पवार हिच्याकडे जिद्द धरत त्याने इयत्ता नववीत आमणी तालुका महागाव येथील टी जी देशमुख माध्यमिक आश्रम शाळा येथे प्रवेश घेतला शिक्षण सुरू असतानाच महाराष्ट्र राज्य इतर मागास व बहुजन कल्याण विभाग यांच्या वतीने घेण्यात आलेल्या राज्यस्तरीय निवड परीक्षेतून भारतीय अवकाश संशोधन संस्था इस्रो बेंगलोर येथे भेटीसाठी त्यास पात्र ठरविण्यात आले

या भेटीचा संपूर्ण खर्च शासनामार्फत करण्यात येत असून, अर्जुन पवार यांनी आपल्या कष्ट, बुद्धिमत्ता व जिद्दीच्या जोरावर हे यश संपादन करून शाळेचे, पालकांचे आणि संपूर्ण तांदळा गावाचे नाव उज्ज्वल केले आहे .या उल्लेखनीय यशाबद्दल ग्रामपंचायत कार्यालय तांदळा, सर्व शिक्षकवृंद, तसेच सरपंच, उपसरपंच, सर्व ग्रामपंचायत सदस्य, पोलीस पाटील व तंटामुक्ती समिती अध्यक्ष ग्रामस्त यांच्याकडून अर्जुन नारायण पवार यांचे भरभरून कौतुक शुभेच्छांचा वर्षावहोत असून अर्जुनचे हे यश गावातील इतर विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरले आहे .

### आयशा हज उमरा टूर्स के ऑफिस के उदघाटन के अवसर पर अझर भाई और बीड ब्रांच के एजाज भाई को मुबारक बात





आयशा हज उमरा टूर्स के ऑफिस के उदघाटन के अवसर पर टूर्स के चालक औरंगाबाद के अझर भाई और बीड ब्रांच के एजाज भाई को मुबारक बात देते हुवे साथ में बीड न प . नगरअध्येक्ष प्रतिनिधी शेख मुजीब व न प . स्वच्छता व आरोग्य सभापती शेख निजाम साहब

# अबब! भूमि अभिलेख विभागात माहिती अधिकारात एका पेजचे शुल्क चक्क सतरा रुपये

➤ पाचोड : अनिस पटेल

माहिती अधिकार कायद्यांतर्गत, सामान्यत : ए– फोर किंवा ए –थ्री आकाराच्या कागदावर प्रति पान माहिती देण्यासाठी दोन रुपये इतके शुल्क आकारले जाते, मात्र पैठणच्या उपअधीक्षक भूमि अभिलेख कार्यालयातील सहाय्यक शासकीय माहिती अधिकाऱ्याने यासाठी चक्क एका पेजच्या झेरॉक्ससाठी सतरा रुपये शुल्क आकारून अजब इतिहासच रचला असल्याची भावना व्यक्त केली जात आहे . एकशे त्रेसष्ट पानांसाठी दोन हजार सातशे एकाहत्तर रुपये शुल्क आकारून संबंधित अधिकाऱ्याने माहिती अधिकार कार्यकर्त्याचे कंबरडे मोडण्याचा प्रयत्न केला . मात्र कार्यकर्त्याने संबंधित शुल्क भरून माहिती हस्तगत केली असून कर्मचाऱ्याच्या या मनमानी कारभाराविरुद्ध ते खंडपीठात दाद मागणार असल्याचेही सांगितले जात आहे .

यासंबंधी अधिक माहिती अशी, कोळी बोडखा ( ता .पैठण ) येथील माजी सरपंच अनिस पटेल यांनी एका विषयासंबंधी पैठणच्या उपअधीक्षक भूमि अभिलेख कार्यालयात माहिती मिळण्यासाठी अर्ज सादर केला होता . शासकिय जनमाहिती अधिकाऱ्याने त्यांना मुदतीच्या अंतीम टप्यात माहिती तयार असल्याचे सांगून ते शुल्क भरून घेऊन जाण्यासंबंधी कळविले . पंधरा दिवस निवडणूकीच्या कामाचे कारण पुढे करून चालढकल करण्यात आली व त्यानंतर शुक्रवारी ( ता .२९ ) १६३ पेजची माहिती देण्यात आली . यासाठी प्रति पेज सतरा रुपये प्रमाणे २७७१ रुपये शुल्क आकारण्यात आले . जेव्हा अनिस पटेल यांनी त्यांना १६३ पेजचे २७७१ रुपये शुल्क कसे काय ? असा प्रश्न केला असता जनमाहिती अधिकाऱ्याने किती शुल्क आकारायाचे हे प्रत्येक विभाग, कार्यालयाच्या मनावर आहे . त्यामुळे आमच्या कार्यालयाची प्रति पेज सतरा रुपये शुल्क असल्याचे सांगितले .

**माहिती देतो म्हणून वेळ मारुन नेली.**

● दरम्यान यासंबंधी अनिस पटेल यांनी प्रति पेज १७ रुपये प्रमाणे १६३ पेजचे शुल्क २७७१ रोख भरून माहिती मिळविली . परंतु एकच माहिती वारंवार देऊन अन्य माहितीला बगल देण्यात आल्याचे पटेल यांच्या लक्षात आले असता संबंधित माहिती अधिकाऱ्याने सोमवारी या उर्वरित माहिती देतो म्हणून वेळ मारून नेली . यासंबंधी सदर विभागाचे जनमाहिती अधिकारी संजय बोर्डे म्हणाले, ''एका पेजचे किती शुल्क घ्यायचे हा ज्या – त्या विभागाचा अधिकार आहे . आमच्या विभागाचे प्रति पेज सतरा रुपये शुल्क असल्याने ही रक्कम घ्यावीच लागली .

**अनिस पटेल,** ( माहिती अधिकार कार्यकर्ते )

### प्रत्येक विभागात भ्रष्टाचाराने कळस गाठला!

● माहिती अधिकार कायदयाला कमजोर करण्याचा प्रयत्न केला जात आहे . मी अधिक शुल्काची रक्कम पाहून माहिती नाकारावी म्हणून हा प्रकार घडला . परंतु आपण यासंबंधी राज्य माहिती आयोग व खंडपीठाकडे तक्रार दाखल करणार आहोत . माहितीसाठी पैसे नाहीत म्हणून माहिती मिळविण्याचा हक्क बाधित करण्याचा हा प्रयत्न आहे .'

# माजलगावात अवैध मुरूम वाहतूक करणारा हायवा पकडला

➤ माजलगाव : प्रतिनिधी

विविध शासकीय कामावर शासनाची रॉयल्टी न भरता अवैधपणे मुरमाचा उपसा करून आणून त्याची वाहतूक करणाऱ्या बाळराजे कन्स्ट्रक्शन कंपनीचा हायवा सोमवारी येथील तहसीलदार संतोष रुईकर यांनी पकडला .

माजलगाव तालुक्यात विविध शासकीय कामे सुरू असून त्या ठिकाणी शासनाची कुठलीही रॉयल्टी न भरता संबंधित ठेकेदार अवैधपणे मुरमाचा उपसा करून त्याची वाहतूक करून शासनाची फसवणूक करत कामाच्या ठिकाणी त्या मुरमाचा वापर करत होते . ही गुप्त माहिती तहसीलदार संतोष रुईकर यांना मिळाली . सोमवारी बाळराजे कन्स्ट्रक्शन कंपनी गेवराई यांचे हायवा टिप्पर क्रमांक



एम एच २३ ६४२७ हे वाहन एका ठिकाणाहून बेकायदेशीर मुरूम उपसा करून माजलगाव गडी रोडने येत असल्याची माहिती मिळाली, त्यानुसार तहसीलदार संतोष रुईकर, तलाठी आप्पासाहेब सानप, ग्राम वसुली अधिकारी तारोळे यांच्या पथकाने बाराभाई तांड्याजवळ हा हायवा थांबवला व त्याची तपासणी केली असता त्यामध्ये पाच ते सहा ब्रास मुरूम आढळून आला . सदरील हायवा ताब्यात घेऊन तहसील कार्यालयात आणण्यात आला .

या अवैध उपसाबाबत संबंधित कंपनीकडे कसलाही परवाना आढळून आला नाही त्यामुळे या कंपनीस २ लाख १८ हजार रुपयांचा दंड ठोठावण्यात आल्याची माहिती तहसीलदार संतोष रुईकर यांनी दिली .

या प्रकाराने एकच खळबळ उडाली असून अशा पद्धतीने दररोज शेकडो वाहने मुरूम, वाळू यांचा उपसा करत असल्याचे दिसून येत आहे अशा वाहनांवर देखील कारवाई तातडीने करावी अशी मागणी होत आहे .

# अधिकमासापूर्वी पुरुषोत्तमपुरीकडे जाणारे रस्ते मजबुतीकरणाचे निर्देश

## डॉ. ओमप्रकाश शेटे यांची पाहणी; सार्वजनिक बांधकाम विभागाची तयारी

**५४.५६ कोटींच्या विकास आराखड्यात रस्त्यांचा प्रश्न ऐरणीवर; भाविकांच्या मागणीला गती**

माजलगाव / अरविंद ओव्हाळ

बीड जिल्ह्यातील माजलगाव तालुक्यातील पुरुषोत्तमपुरी हे भारतातील एकमेव अधिकमास दैवत भगवान पुरुषोत्तम यांच्या वास्तव्यामुळे देशभरात प्रसिद्ध तीर्थक्षेत्र आहे . दरवर्षी लाखो भाविक येथे दर्शनासाठी येतात . या स्थळाला शासनाने अधिकृत तीर्थक्षेत्राचा दर्जा दिला असून, विकास आराखड्यासाठी ५४ कोटी ५६ लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे . त्यानुसार मंदिराचे बांधकाम पारंपरिक पद्धतीने सुरू असून काम प्रगतीपथावर आहे .

मात्र, पुरुषोत्तमपुरीकडे येणाऱ्या चारही बाजूंच्या रस्त्यांची अवस्था अत्यंत खराब असल्याने भाविकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे . याबाबत जिल्हाधिकारी, तहसीलदार तसेच सार्वजनिक

**● पुरुषोत्तमपुरी हे भारतातील एकमेव अधिकमास दैवताचे तीर्थक्षेत्र ● लाखो भाविकांची वार्षिक गर्दी; रस्त्यांची अवस्था अत्यंत दयनीय ● मंत्रालयीन पाठपुराव्यानंतर मुंबई पातळीवर हालचाली ● अधिकमास (१७ मे ते १४ जून २०२६) आधी रस्ते पूर्ण करण्याचे निर्देश**



बांधकाम विभागाकडे वारंवार निवेदने देऊनही प्रत्यक्ष कामाला गती मिळाली नव्हती . अखेर मंदिर कमिटीने मंत्रालयात दाद मागितल्यानंतर मुंबई पातळीवर हालचाली सुरू झाल्या .

सोमवार, दिनांक ९ रोजी आयुष्यमान भारत मिशन महाराष्ट्र समितीचे अध्यक्ष डॉ . ओमप्रकाश शेटे यांनी मौजे पुरुषोत्तमपुरी ( ता . माजलगाव, जि . बीड ) येथील देवस्थानाकडे जाणाऱ्या नियोजित रस्त्यांची पाहणी केली . यावेळी त्यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपअभियंता विष्णू जाधव व अभियंता चंद्रकांत जेटूरे यांना प्रत्येक रस्त्याचे नकाशे दाखवून, येणाऱ्या अधिकमासापूर्वी सर्व रस्त्यांचे मजबुतीकरण पूर्ण करण्याच्या स्पष्ट सूचना दिल्या . त्यानुसार सार्वजनिक बांधकाम विभागाने प्रत्यक्ष स्थळ पाहणी करून कामाची तयारी सुरू केली आहे .



या पाहणीवेळी डॉ . ओमप्रकाश शेटे ( अध्यक्ष, आयुष्यमान भारत मिशन महाराष्ट्र समिती ), विष्णू जाधव ( उपअभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग ), चंद्रकांत जेटूरे ( अभियंता ), बंडूखांडेकर ( अध्यक्ष, देवदूत प्रतिष्ठान ), अशोक करे ( भाजपा माजी तालुका अध्यक्ष ), सरपंच उत्तरेश्वर खताळ, महादेव कुंडकर, विजय गोळेकर ( अध्यक्ष, पुरुषोत्तमपुरी मंदिर कमिटी ), भाऊसाहेब गोळेकर, नारायण गोळेकर, अविनाश धिरडे, अशोक माने, पत्रकार पद्माकर देशमुख, पत्रकार रामराव आगे आदी उपस्थित होते .सन २०२६ मध्ये पुरुषोत्तम महिना ( अधिकमास ) १७ मे ते १४ जून या कालावधीत येत असून, या पार्श्वभूमीवर शासनाने तातडीने लक्ष घालून पुरुषोत्तमपुरीकडे येणाऱ्या चारही बाजूंच्या सर्व रस्त्यांचे मजबुतीकरण पूर्ण करावे, अशी जोरदार मागणी भाविकांकडू होत आहे .

**दादांनी जोडली होती जिवाभावाची माणसं** ➤ घरचा माणूस गेल्याचे दु:ख; आठवणी झाल्या जाग्या....!!!

# “वचन दिलं होतं येण्याचं... पण प्रतिमेतूनच उपस्थित!”

# अजित दादांच्या आठवणींमध्ये लखन थावरेंचा विवाह

➤ माजलगाव : प्रतिनिधी
वडवणी : अशोक फपाळ

महाराष्ट्राचे दिवंगत उपमुख्यमंत्री स्व . अजित दादा पवार यांच्या स्मृतींना साक्ष ठेवत चि . लखन थावरे व चि . सौ . का . दिव्या यांचा विवाह सोहळा शुक्रवार, दि . ६ फेब्रुवारी रोजी सोपारा–वाहेगाव, ता . परतूर, जि . जालना येथे भावनिक वातावरणात पार पडला . लग्नविधीपूर्वी वधू–वरांनी छत्रपती शिवाजी महाराज, राजमाता जिजाऊ, संत–महंत व महापुरुषांच्या प्रतिमांसह दिवंगत नेते स्व . अजित दादा पवार यांच्या प्रतिमेला शुभहस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले .



**तीच आमची शेवटची भेट ठरली**

● “मी दादांना माझी लग्नपत्रिका घेऊन लातूर येथे गेलो होतो . ‘तुझ्या लग्नाला नक्की येईन,’ असा त्यांनी मला विश्वास दिला होता . तीच आमची शेवटची भेट ठरली .त्यांचे असे अचानक जाणे आजही मनाला पटत नाही . माझ्या लग्नात असे अभिवादन करावे लागेल, असे कधीच वाटले नव्हते .”

– **लखन थावरे**

त्यानंतरच विवाहविधी पार पडला . उपमुख्यमंत्री, अर्थमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री असलेले स्व . अजित दादा पवार यांच्याशी लखन थावरे यांचा अतिशय जवळचा संबंध होता . त्यांच्या प्रत्येक निवडणुकीत प्रचार यंत्रणेत ते सक्रियपणे सहभागी होत असत . पवार कुटुंबातील सदस्याप्रमाणे जिव्हाळ्याचे नाते असलेले लखन थावरे हे अजीतदादांचे लाडके कार्यकर्ते म्हणून ओळखले जात होते .

सामान्यत : विवाह समारंभात छत्रपती शिवाजी महाराज, राजमाता जिजाऊ, संत–महंत यांच्या प्रतिमांचे पूजन केले जाते . मात्र, विमान अपघातात स्व . अजित दादा पवार यांचे अकाली निधन झाल्याने ते या विवाहाला प्रत्यक्ष उपस्थित राहू शकले नाहीत . तरीही “ते आपल्यासोबतच आहेत” या भावनेतून त्यांच्या प्रतिमेला विशेष स्थान देत प्रथम अभिवादन करण्यात आले . स्व . अजित दादा पवार यांच्यावरील अपार प्रेम आणि निष्ठा या प्रसंगातून स्पष्टपणे दिसून आली . दादांना अभिवादन करून विवाह करण्याचा हा अनोखा आणि भावनिक क्षण सर्वत्र चर्चेचा विषय ठरला आहे .

या विवाह सोहळ्यास मा . आ . राधाकृष्ण होके पाटील, मा . आ . मोहनराव काका सोळंके, मा . सभापती जयसिंग भैय्या सोळंके, विरेंद्र सोळंके, डॉ . प्रकाश आनंदगावकर, शेषेराव जगताप, संभाजी शिंदे, औदुंबर सावंत, कल्याण आबुज, चंद्रकांत शेजुळ, बजरंग साबळे, सचिन लंगडे, खलील पटेल, डॉ . अशोक तिडके, ॲड . राज पाटील, ॲड . माधव शेंडगे, नितीन शिनगारे, अमोल जगताप, भागवत दराडे यांच्यासह सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, चेअरमन, पत्रकार, उद्योजक, नगरसेवक व व्यापारी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते .